उप-वनसंरक्षक, अकोला यांचे कार्यालय
आवक क्रमांक 3863
दिनांक 28/3/2023

कार्यालय
उपवनसंरक्षक, अकोला वन विभाग
क्र. 3963
23 MAR 2023
O.S./मु.ले.
उवसं अकोला

प्रति,

मा. उपवनसंरक्षक (जा)
अकोला वनविभाग, अकोला
जिल्हा अकोला

विषय : शेतीसाठी भुमीगत पाण्याची पाईपलाईन व इलेक्ट्रीक लाईन टाकण्यासाठी मौजे मोझरी खु./ घोटा/धारगिरी ता. बार्शिटाकळी जि. अकोला येथील मधुकर शेवला राठोड व इतर ९ यांचे शेतात सिंचनाकरीता पाईप लाईन व इलेक्ट्रीक लाईन टाकणे बाबत ०.३२ हे. वनजमीन वळती करणाचे प्रस्ताव.

संदर्भ : १) आपले पत्र क. सर्व्हे वसंअ/९८०/४२६७/२०२२ २०२३ दि.२३/०३/२०२३.
२) शासन, महसुल व वनविभाग पत्र क. एफएलडी—३०२३/प्र.क्र. ३४/फ—१० दि. १६/०२/२०२३.

महोदय,

वरील संदर्भीय शासन पत्रान्वये उपस्थित करण्यात आलेल्या ६ मुद्यांच्या अनुषंगाने सविस्तर माहीती खालील प्रमाणे :

| अ.क्र. | त्रुटी | पुर्तता |
|---|---|---|
| १ | प्रस्तावामध्ये पाण्याची पाईपलाईन व इलेक्ट्रीक लाईनसाठी ३ अन्य पर्याय दिले आहेत. त्यापैकी अ येथील पर्याय वनक्षेत्राच्या दृष्टीने सर्वात उपयुक्त असल्याने प्रस्तावित करण्यात आला आहे. इतर ब आणि क पर्यायामध्ये जास्त वनक्षेत्राचा वापर होत असल्याने पर्याय नाकारले आहेत. परंतु, नकाशाचे अवलोकन केले असता, अ ब आणि क येथील पर्यायीसाठी अनुक्रमे ७६० मी. , ७०१ मी. आणि ६२५ मी. लांबी एवढया क्षेत्राचा वापर होणार आहे. या उक्त ३ पर्यायापैकी क येथील पर्यायामध्ये कमी वनक्षेत्राचा | पर्याय अ. : जमीन ओलीत करण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहे. कारण पर्याय अ मुळे तलावातील पाण्याचा साठा भरपुर असणार आहे. कारण पाण्याची खोली राहील.पर्याय अ प्रमाणे पाईप लाईन टाकणेची जागा सपाटी ची आहे व त्या जागेत वनविभागाचे वनीकरणाचे कोणत्याच प्रकारचे नुकसान होत नाही तसेच १० शेतकऱ्यांचे शेत अलग अलग असुन पाईप लाईन वनविभागामधुन शेतकरी सर्वे नं. ६५ पर्यंत नेउन तेथुन इतर शेतकऱ्याचे शेतात जाईल. व अ पर्यायामुळे पाईप लाईन टाकणे करीता सोईचे राहणार आहे. पर्याय अ मध्ये ६०० मी. लांबी दाखविलेली आहे कारण तलावातील पाणी पातळी मागे मागे सरकत असल्यामुळे शेतकऱ्यांनी प्रस्ताव टाकताना उन्हाळयात तलावात पाणी मागे सरकले तेथुन मोजमाप केले. ज्यावेळी वनविभागाने G.P.S. व्दारे मोजणी केली तेव्हा पावसाळयात भरलेले असतांना तलावाच्या काठावरून मोजणी केल्यामुळे ते अंतर कमी झालेले आहे.<br><br>पर्याय ब : तलावामध्ये पाण्याचा प्रवाह हा वरून येत आहे. तलावाची भिंत खालील टोकाकडे आहे. पर्याय ब प्रमाणे पाईप लाईन टाकली तर पाण्याचा पुरवठा लवकर संपेल ते पाणी |

| | | |
|---|---|---|
| | वापर होत असल्याचे दिसून येते. असे असतानाही प्रस्तावित अ येथील ७६० मी. पर्यायापेक्षा जास्त अंतराचा म्हणजेच ८०० मी. अंतराचा प्रस्ताव सादर केलेला आहे. तरी याबाबतचे स्पष्टीकरण सादर करावे. | काही दिवसानंतर पाणी मागे जाईल व तेथे तलावाची खोली कमी आहे. पाणी कमी राहत असल्यामुळे व ते लवकर संपत असल्याने ओलीत करणे त्रासाचे होईल.<br><br>**पर्याय क.** : पर्याय क प्रमाणे पाईप लाईन व 11KV इलेक्ट्रीक लाईन टाकता येत नाही, कारण त्या भागामध्ये कमीत कमी १० फुटापर्यंत पाणी वाहुन नाला (दरी) ३ ते ४ नाले असल्यामुळे पाईप लाईन व इलेक्ट्रीक लाईन टाकता येत नाही. |
| २ | उक्त ३ पर्यायी व्यतीरिक्त अन्य एक पर्याय उपलब्ध असुन, मौजे मोझरी, स.नं. ३५ येथील वनेतर क्षेत्रामधुन पाण्याची पाईपलाईन व इलेक्ट्रीक लाईन टाकल्यास अंदाजे २०० २५० लांबी एवढेच क्षेत्र लागू शकेल, त्याबाबत माहीती सादर करावी. | उक्त ३ पर्यायी व्यतीरीक्त अन्य पर्याय मोझरी सर्वे नंबर आहे. आमचे शेताचे विरूध्द दिशेने मोझरी स.नं. ३५ आहे. नकाशा प्रमाणे आमची शेती तलावाच्या पुर्व दिशेला असुन सर्वे नं. मोझरी चे ३५ हे. पश्चिम दिशेला दिसुन येते. तसेच धरागिरीचा सर्वे नं. ३५ चे अवलोकन केले असता तो पर्याय कोणत्याच प्रकारे हिताचे नाही, कारण मोझरी तलावातुन पाईप लाईन धारागिरी ३५ मधुन टाकणे खर्चाच्या व पाणी पुरवठयाच्या अनुषंगाने परवडत नाही. सोबत मोझरी खु. भु. मा.क्र. ३४ व ३५ धारागिरी भुमापन क्र. ३५ चा ७/१२ जोडला आहे. नकाशा प्रमाणे वरील पर्याय उपयुक्त नाही. |
| ३ | भुमीगत इलेक्ट्रीक लाईन टाकण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेले ३.०० रूंदी चे क्षेत्र व्यवहार्य वाटत नाही. याबाबत अधिक माहीती सादर करावी. तसेच, पाईप लाईनच्या खंदकामध्ये इलेक्ट्रीक लाईन टाकता येणे शक्य आहे किंवा कसे, याबाबतही माहीती सादर करावी. | भुमीगत इलेक्ट्रीक लाईन करीता ३ मी. रूंदी जागा मागण्याचे कारण पाईप लाईन व 11KV इलेक्ट्रीक लाईन वेगवेगळया दोन खंदक (नाली) खोदावे लागणार आहे. पाईप लाईनची तुट फुट कधीही होउ शकते. पाईप लाईन व 11KV इलेक्ट्रीक लाईन मध्ये २ मी. अंतर ठेवुनच खोदावी लागेल. कारण पाईप लाईन तुट फुट दुरूस्ती करतांना इलेक्ट्रीक केबलला धक्का लागल्यास जिवीत हाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.<br>पाईप लाईन व 11KV इलेक्ट्रीक लाईन एकच टाकली असता जर इलेक्ट्रीक लाईन मध्ये बिघाड झाल्यास पाण्याच्या पाईप लाईनला ओलावा असल्यामुळे जमीनीमधुन करंट शेतात पाणी देण्याच्या ठिकाणी पोहचेल व पाणी देणारा माणुस दगावु शकतो. |
| ४ | पर्यायी वनीकरणासाठी केंद्रस्थ अधिकारी यांनी मौजे मोझरी, ता. बार्शिटाकळी मधील कंपा क्र. ३९७ येथील आणि उपवनसंरक्षक यांनी मौजे सोनखास ता. बार्शिटाकळी | वनविभागा संबंधीत. |

| | | |
|---|---|---|
| | मधील कंपा क्र. ३९७ येथील वनक्षेत्र प्रस्तावित केले आहे. सदर २ क्षेत्रापैकी नेमके कोणते क्षेत्र पर्यायी वनीकरण प्रस्तावित करावयाचे आहे, याबाबत माहीती सादर करावी. तसेच सदर क्षेत्राचा ७/१२ देखील सादर करावा. | |
| ५ | प्रस्तावित केलेल्या मौजे मोझरी, मधील गट नं. २५ हा कंपा क्र. ३९७ चा भाग असल्याचे नमुद केले आहे. परंतु नकाशा व KML वरून गट नं. २५ मधील क्षेत्र कंपा क्र. C29B चा भाग असल्याचे दिसते. सबब, याबाबत खात्री करण्यात यावी. | वनविभागा संबंधीत. |
| ६ | प्रस्तावामध्ये वळतीकरणसाठी प्रस्तावित केलेल्या मौजे मोझरी येथील गट नं. २३, २४ व २५ या जमीनीच्या ७/१२ उतारावर अनुक्रमे ए क्लास, सरकार व सी क्लास अशा नोंदी आहेत. सबब सदर वनजमीन आहे किंवा कसे? याबाबत खातरजमा करणे आवश्यक आहे. | वनविभागा संबंधीत. |

वरील प्रमाणे पर्याय १ ते ६ बाबत माहीती पुरविण्यात येत आहे.

हि विनंती.

आपूला विश्वासु

मधुकर शेवाळा राठोड

(मधुकर शेवला राठोड व इतर ९)

रा. मोझरी/घोटा

ता. बार्शिटाकळी जि.अकोला

दिनांक : 26/03/2023

Deputy Conservator of Forests
AKOLA Division, Akola